# मातृसूक्त

बापू दासरी
‘उमाग्रज’

राजहंस प्रकाशन

साक्षात शिवकल्याण गुरुमाउलींनी
ज्यांच्या मांडीवर समाधी घेतली,
ते माझे काका
स्व. पांडुरंग बापुजी दासरी
यांना

# आईच्या आठवणी म्हणजे गाभाऱ्यातील धूप-दीप

बाळाचा जन्म या जगात झाल्याबरोबर त्याने केलेल्या पहिल्या ‘टॅऽऽहॅऽऽ’पासून ते त्याच्या आर्त ‘आईऽगंऽऽ’ या शब्दापर्यंतचा प्रवास म्हणजे जगण्याची नांदी होय. पुढील वाटचालीत आपल्या प्रत्येक श्वासाच्या स्पंदनावर आईचा जोजविणारा स्वर आपल्या व्यक्तिमत्त्वात चैतन्य भरत असतो.

‘आई’ या दोन एकत्र स्वरांवर जगामध्ये आजवर प्रचंड लिखाण झालं आहे, होत आहे, पुढेही होत राहील. अनेक नामवंतांनी आईवर लिहिलं आहे; पण अजूनही आई शब्दांमध्ये सामावू शकली नाही, असं माझं ठाम मत आहे. प्रत्येकाला आपल्या आईबद्दल प्रचंड आदर आणि प्रेम असतेच, पण प्रत्येकाची आईबद्दलची संवेदना आणि विचार यामध्ये थोडी थोडी भिन्नता असू शकते. खस्ता खात जगणं, आपल्या परिवाराचा संपूर्ण विकास करण्यासाठी सतत कष्ट उपसणं या बाबी सर्वांच्या आईने केलेल्या आहेत. पण अनेक भूमिका बजावत असताना उपलब्ध साधनसामग्री आणि तिच्यासमोर उभे असणारे प्रतिकूल परिस्थितीचं मोठं आव्हान व कुठल्याही सोयीसुविधा उपलब्ध नसताना त्याला धीरोदात्तपणे तोंड देणारी आई असते. याची खरी जाणीव आई गेल्यावरच होते. सामाजिक न्यायविभागात कार्यरत असताना, मी वृद्धाश्रमांना भेटी दिलेल्या आहेत. तिथे प्रवेशित असलेल्या अत्यंत सुखवस्तू घरातील आईची व्यथा आणि त्यांच्या भोगातील कारुण्यभाव पाहून मन भरून यायचं व खूप रडावंसं वाटायचं. पण मी तेव्हा अधिकारीपदावर असल्यामुळे सर्वांसमोर मला रडताही येत नसे.

फक्त नाळ तुटून आईपासून वेगळं झाल्यानंतर तिच्या अंगावरचे दूध पिऊन आपण सक्षम नागरिक होईपर्यंत तिने केलेला सांभाळ, प्रतिपाळ आणि तिचे संस्कार आपण कधीच विसरू नयेत, अशी माझी एकच प्रामाणिक आणि उत्कट भावना.

मला कळू लागल्यानंतर, आईचे कष्ट, तिला होत असलेल्या हालअपेष्टा याची योग्य दखल त्यावेळी मी घेतली नाही, असे मला अजूनही वाटते. माझ्या अठ्ठावन्न वर्षांच्या वाटचालीत सतत आई सोबत होती. ३ मार्च २०२४ रोजी ती आम्हाला सोडून गेली.

भूतकाळात डोकावल्यानंतर आठवणींच्या अनेक सूक्ष्म खुणा माझ्याभोवती फेर धरून मला प्रश्न विचारत राहिल्या. आणि तेव्हापासून माझ्या भावविश्वामध्ये सतत आई आणि तिची प्रतिमा माझ्याशी बोलत असतात.

आम्ही भावंडं लहान असताना प्राथमिक शिक्षण घेताना रोज संध्याकाळी शुभंकरोती आणि परवचा म्हणण्याची पद्धत होती. तुळशीजवळ दिवा लावल्यानंतर आम्ही तिघं भावंडं एका रांगेत उभे राहून परवचा म्हणत असू. आई फार कमी शिकलेली असली; तरी परवचा म्हणताना पाढे कुठे चुकत आहेत, हे तिला कळत असे. एक वेताची छडी पाढा चुकल्यानंतर माझे काका एकदम हळू पाठीवर मारत असत.

माझे काका म्हणजे एक विद्यापीठच. अतिशय लोभस व्यक्तिमत्त्व. ऐन तारुण्यात पत्नी वारल्यानंतर त्यांनी उभा जन्म गुरुसेवा करण्याचं ठरवलं आणि लहान भावाची निरपेक्ष सोबत करायची असं व्रत घेतलं. आमचे बाबा वयाने त्यांच्यापेक्षा लहान. बाबा स्वातंत्र्यसैनिक होते आणि स्वभावाने तापट होते. त्यांनी माजी गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यासोबत स्वातंत्र्यसंग्राम चळवळीत काम केले असल्यामुळे आणि आदरणीय शंकररावजी चव्हाणसाहेब यांना वाहन चालवण्याचं प्रशिक्षण आमच्या बाबांनी दिलं असल्यामुळे, आदरणीय शंकरराव चव्हाण 'हे माझे विद्यार्थी आहेत' अशाच तोऱ्यात ते वागत असत.

बाबा शासकीय नोकरीत असल्यामुळे आणि नेहमी दौऱ्यावर असल्यामुळे आमचा ताबा काकांकडे असायचा. मला खूपच अभिमानाने सांगावेसे वाटते की, आमचे बाबा त्यांचा पूर्ण पगार काकांच्या हातात आणून द्यायचे आणि पूर्ण घर काका चालवायचे. आमची आई आमच्या काकांना वडिलांच्या ठायी मानायची. आणि काकांच्या आज्ञेत आम्ही सगळे शिस्तीत असायचो. काकांकडे कुठलाही व्यवसाय किंवा संपत्ती नव्हती. त्यांना संपत्ती गोळापण करायची नव्हती. फक्त आम्हा भावंडांवर चांगले संस्कार झाले पाहिजेत, एवढाच त्यांचा उद्देश. आणि त्यांच्या गुरु महाराजांनी त्यांच्या मांडीवर समाधी घेतलेली बाब पोथीत नमूद असल्यामुळे त्यांच्याबाबत पूर्ण कुटुंबाला नितांत आदर होता.

एकदा काका किराणा दुकानावर महिन्याचं सामान आणण्यासाठी गेले असता मी सोबत होतो. मी सोबत आहे असं पाहून काकांना न कळू देता दुकानदाराने एक चॉकलेट माझ्या खिशात टाकलं. घरी आल्यावर मी खिशातलं चॉकलेट लपून खाण्याचा प्रयत्न केला. लगेच काकांनी ते चॉकलेट ताब्यात घेतलं, मला घेऊन परत दुकानावर आले आणि दुकानदाराला हात जोडून विनंती केली की, अशा प्रकारची वाह्यात सवय बापूला लावू नका. त्यांनी दुकानदारास

चॉकलेट परत घ्यायला लावलं अन् मला सांगितलं, ''खबरदार जर कोणाकडून असं कधी काही घेतलं, तर माझ्याइतकं जगात कोणी वाईट असणार नाही.'' त्यांच्या वृद्धापकाळात माझ्या आईने त्यांची सेवा त्यांना आपल्या वडिलांच्या ठायी समजून अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने त्यांच्या मृत्यूपर्यंत केली. आमचे काका माझ्या आईला 'ही माझी साक्षात माय आहे रे, बापू' असं म्हणायचे.

शासकीय निवासस्थानामध्ये राहताना बाजूच्या असलेल्या रिकाम्या जागेत आईने परसबाग केली होती. तिथे छान फुलांची झाडं आणि फळं भाजीपाला नियमित घेतला. मला आठवतं, आम्ही दहा वर्षं तरी भाजी आमच्या परसबागेतलीच खाल्ली आहे. त्यात टमाटे, वांगी, मक्याची कणसं, आवऱ्याच्या शेंगा, मुगाच्या शेंगा, हादग्याची फुलं आणि शेवगा अशी आमच्या जेवणामध्ये भाज्यांची चंगळ असायची.

आईचे रोजचे कष्ट कमी की काय, बाबांनी त्यात भर म्हणून एक गाय आणली होती. ही गाय नुकतीच व्याली असल्यामुळे तिचं वासरू रिक्षात ठेवून रिक्षा चालू लागली की, त्याच्या पाठीमागे गाय जोरात पळायची - असं करत तिला परभणीहून नांदेडला आमच्या बाबांनी आणलं होतं. नुकतीच व्यालेली गाय आपल्या वासराच्या ओढीने कितीही किलोमीटर चालू शकते, जाऊ शकते हे पाहिल्यानंतर आई गेल्यानंतर, आईचं केवळ मुलांसाठी झुरणं किती होतं, याची आठवण आजही येते.

पहाटे चारला उठल्यानंतर अंगण झाडून, सडा घालून जात्यावरच्या ओव्या म्हणत आवश्यक ते जात्यावरचं दळण दळताना आईने अनेक कविता ओव्या रचल्या असतील, पण त्याची कुठे नोंद नाही. पण याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम माझ्या व्यक्तिमत्त्वावर होत गेला. आणि यातूनच मी तोडकंमोडकं लिहीत गेलो. त्याकाळी आईने जात्यावर दळलेले सातूचे पीठ एकदम चविष्ट असे.

सकाळी सकाळी तिचा आवाज घरभर घुमायचा आणि मग आम्हाला जाग यायची. तुकारामाची अख्खी गाथा आमच्या काकांना पाठ होती. ते सुद्धा सुरेल आवाजात अभंग म्हणायचे. मग गाईचं दूध काढलं की आई हळूच मला 'बापू' म्हणून हाक मारायची आणि एक ते दीड ग्लास धारोष्ण दूध मला प्यायला द्यायची. मी एकुलता एक मुलगा म्हणून आई माझे लाड करायची.

पाणी तापवण्यासाठी घराच्या अंगणात वत्तल असे, तुराट्या कचरा आणि जळतणाची लाकडं टाकून मोठ्या हंड्यात पाणी गरम करायला ठेवल्यानंतर त्याच्याभोवती आम्ही तिघे भावंडे दात घासत बसत असू.

शेजारीपाजारी घरातील मुलांना कधी ताप वगैरे आला, तर त्या मुलांच्या

आया मुलांना घेऊन आईकडे येत असत! मग आई एक ग्लास पाणी घ्यायची, उदबत्ती घ्यायची आणि पाणी मंतरून त्या ग्लासातील पाण्याने त्या मुलाच्या तोंडावर दोन-चार पाण्याचे हबके मारायची आणि ग्लासातील उरलेले पाणी त्या मुलाला प्यायला द्यायची! त्यामुळे आजार कमी होत असत. हे खरं की खोटं हा भाग वेगळा असला; तरी आपल्या संसाराच्या रामरगाड्यातून दुसऱ्याचं प्रामाणिक हितचिंतन कसं करावं, याचा हा वस्तुपाठ होता.

आयुर्वेदिक औषधाच्या तीन पुड्या करून आई विनामूल्य द्यायची ज्यामुळे अत्यंत गंभीर झालेला कावीळ आजारसुद्धा कमी होत असे. आजही आमच्याकडे काविळीचं औषध न्यायला लोक येतात. आणि काविळीचा आजार तीन दिवसांत कमी होतो हे विशेष. आई रोज घराच्या अंगणामध्ये जिथे भेगा असत, त्यात तिथून मुंग्या वर येत. त्या मुंग्या घरभर पसरू नये म्हणून म्हणा किंवा त्यांची भूक भागावी म्हणून आई त्या भेगांमध्ये साखर टाकायची. तसेच एक येळणी पाणी चिमण्यांना पिण्यासाठी ठेवायची, बाजूला तांदूळ पसरून ठेवायची, नियमित गोग्रास गाईसाठी अग्नीला घास दिल्यानंतर द्यायची, ज्याला आम्ही गाईचं चिपटं म्हणायचो.

सरकारी सदनिकेत राहताना आईचं एकच स्वप्न होतं की, तिचा मृत्यू हा किरायाच्या घरात नाही तर स्वत:च्या घरात झाला पाहिजे, कारण ती नेहमी म्हणायची, 'माणसाला स्वत: पाय खोरून मरायला स्वत:च्या हक्काची जागा असावी.' आणि तिने ते खरं करून दाखवलं. मला आठवतं घराचं बांधकाम चालू असताना पायाभरणीच्या वेळी तिने आयुष्यभर जमा केलेल्या महालक्ष्मीच्या गळ्यातील पिवळ्या दोऱ्या घराच्या बांधकामाच्या पायाभरणीत घातल्या होत्या.

या कृतीने घरातील लक्ष्मी आणि पावित्र्य अबाधित राहते, अशी तिची ठाम श्रद्धा होती. ही श्रद्धा आहे की अंधश्रद्धा या भानगडीत मी पडू इच्छीत नाही, पण या पाठीमागे असलेला भविष्याबद्दलचा कळवळा आणि भावना शब्दातीत आहे. कित्येकदा माझ्या परीक्षेची फी भरताना मला नोकरी लागायच्या आधी तिने हप्त्याहप्त्याने घेतलेल्या वस्तू आणि कानातले विकल्याचं मला आठवतं. माझे बाबा गेल्यानंतर त्यांची स्वातंत्र्यसैनिकाची व शासकीय नोकरीची पेन्शन आईला मिळत असे. त्या पेन्शनमधून ती ठरावीक रक्कम बाजूला काढायची व आईची एक लहान बहीण म्हणजे माझी अनाथ नरसम्मा मावशी एकटीच मेंडका या गावात विशेष म्हणजे एका मारुती मंदिरात राहते, तिला दरमहा आई पैसे पाठवायची उदरनिर्वाहासाठी मदत म्हणून. साधारण परिस्थितीत

जगत असतानाही आपल्याकडील काही इतरांसाठी आपण देणं लागतो, याची ती आम्हाला सतत जाणीव करून देत असे.

मला शासकीय नोकरी लागल्यानंतर व त्याआधी जेव्हा जेव्हा, मी कोणतीही परीक्षा पास झालो, तेव्हा तेव्हा आईने मला कुशीत घेऊन दिलेली शाब्बासकी हा मला सर्वोच्च पुरस्कार वाटतो. हल्ली ९९% मार्क घेतल्यानंतर एक मार्क कमी म्हणून आपल्या मुलाबद्दल शोकसंवेदना बाळगणारे पालक आहेत. या अर्थाने मी खूप भाग्यवान होतो, असं मला वाटतं. काठावर फर्स्ट क्लास किंवा उच्च सेकंड क्लास याच्यापलीकडे आम्ही आमची गुणवत्ता सिद्ध करू शकलो नाही; पण आम्ही वेळोवेळी उत्तीर्ण झालो आणि कधीच वर्ष वाया गेलं नाही, याचा आमच्या आईला प्रचंड अभिमान होता. मला नववीची परीक्षा दिल्यानंतर टंकलेखनासाठी क्लास लावताना आई म्हणायची, 'याच्यातूनच तुझा पुढे उत्कर्ष होईल.' आणि तसंच झालं. आजही मी जेव्हा टंकलेखन करतो, तेव्हा आजूबाजूचे लोक माझी टंकलेखनाची गती पाहून स्तिमित होतात. एक साधा टंकलेखक ते समाजकल्याण अधिकारी म्हणून राजपत्रित पदावर विराजमान होण्याची माझी प्रगती माझ्या आईने बघितली आणि प्रत्येक टप्प्यावर त्या त्या वेळी तिने माझा यथोचित सत्कार केला. मी समाजकल्याण अधिकारी म्हणून पदोन्नत झाल्यानंतर तिने माझा पुष्पहार घालून केलेला सत्कार आणि त्यावेळी तिच्या डोळ्यात आलेले आनंदाश्रू हा माझ्यासाठी सर्वोत्कृष्ट पुरस्कार होता.

आमचं घर विमानतळाजवळ आहे, रोज विमानं यायची-जायची; तेव्हा आई वर विमानाकडे दुरून बघायची. मग मी ठरवलं, आईला एकदा विमानात बसवायचं. मग एकदा तिरुपतीला दर्शनासाठी तिला घेऊन गेलो, तेव्हा हैदराबाद ते तिरुपती आणि पुन्हा तिरुपती ते हैदराबाद असा विमानप्रवास केला. माझी छाती अभिमानाने फुलून आली की, मी माझ्या आईला एकदा विमानात बसवलं, पण तिला त्याचं काही कौतुक वाटलं नाही. म्हणून मी तिला विचारलं, 'आई, तुला मी विमानात बसवलं, तुला काय वाटतं?' तर ती म्हणाली, 'अरे, एवढा खर्च कशाला केलास?' यावर मी निरुत्तर झालो.

माझ्या लग्नानंतर मला तीन मुली झाल्या. हे पाहून आमचे वडील म्हणायचे, 'मी माझ्या बापूला मुलगा व्हावा म्हणून दुसरी बायको करतो.' त्यावेळी आई खूप रागात यायची आणि बाबांशी वाद घालून ती त्यांच्या या विचाराला नेहमी अडथळा निर्माण करायची. त्यामुळे माझं अजून एक लग्न होऊ शकलं नाही, हे मी माझे भाग्य समजतो. 'बापू, तुला झालेल्या तिन्ही मुली या लक्ष्मी आहेत.' असं ती नेहमी म्हणायची. आई फक्त साक्षर असूनही, तिला मुलगा होण्यासाठी

स्त्रीचा दोष नसतो, ही बाब माहिती होती, याचं खूप आश्चर्य वाटतं.

माझ्या दोन्ही लहान बहिणी आणि मी आमच्या सर्वांचे कपडे आमच्या नववीपर्यंत आई स्वत: शिलाई मशीनवर शिवायची आणि खर्चाची बचत करायची. फक्त साक्षर असूनही ती अर्थशास्त्रज्ञ होती. तिला अचूक व्यक्तीपरीक्षा होती, संपर्कात आलेल्या माणसाचा चेहरा पाहून त्याच्या भावना ती लगेच ओळखायची, उच्चभ्रू आणि श्रीमंत लोकांच्या बायका आपली आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे आपला अधिक्षेप करतील, या भीतीने ती त्यांच्यापासून नेहमी दूर राहायची.

वयाच्या ८८व्या वर्षी तिचं निधन झालं! त्यापूर्वीची वार्धक्यातील तिची शुश्रूषा करण्याचं भाग्य मला सतत लाभलं, कारण मुलीकडे आपण जाऊन राहू नये, मुलीचं आपण खाऊ नये ह्या भावनेने ती माझ्याकडेच राहिली. शेवटपर्यंत घरात कोणत्या डब्यात काय आहे, कधी कोणता सण आहे, याबाबतची खडानखडा माहिती तिला अवगत असायची.

माझं आणि माझ्या नातीचं किंवा माझ्या मुलींचं थोडंसं भांडण झालं, तर त्या थेट माझी तक्रार माझ्या आईकडे करीत आणि मग ती मला खूप जोरात 'भामट्या' म्हणून रागवत असे. आईने रागवलं की, या सर्वांना खूप आनंद व्हायचा, आपल्या बापाला पण कोणीतरी रागवणारं आहे. आई गेल्यानंतर त्यांचं एक भक्कम न्यायालय गेलं, असं मला वाटतं. त्याही मग व्याकूळ होतात, तिच्या आठवणीत.

ह्या सगळ्या आठवणीतल्या प्रतिमा माझ्या मनावर खोलवर परिणाम करत राहिल्या आणि त्यातून आईवरच्या कविता निर्माण झाल्या. या कविता वाचून माझे मित्र सुप्रसिद्ध साहित्यिक देवीदास फुलारी यांनी या संग्रहाला 'मातृसूक्त' हे नाव सुचविले. डॉ. किरण गिरगावकर यांनी प्रत्येक कवितेची समीक्षा केली व आवश्यक तेथे बदल सुचविले. माझे मित्र महाराष्ट्रातील ख्यातकीर्त गीतकार आणि कवी दासू वैद्य यांनी अतिशय सुंदर पाठराखण केली, राजहंस प्रकाशनाचे डॉ. सदानंद बोरसे आणि श्री. शिरीष शेवाळकर यांनी हा संग्रह प्रकाशित करण्याचं ठरवलं, मुखपृष्ठ श्री. सरदार जाधव यांनी साकारलं. अक्षरजुळणी मुग्धा दांडेकर यांनी केली. तसेच राजहंस प्रकाशनाच्या तृप्ती देशपांडे यांचीही मदत झाली. गझलकार प्रदीपजी निफाडकर यांनी या कवितांना प्रोत्साहन दिलं. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वृषालीताई किन्हाळकर यांनी कवितांची मुक्त आस्वादक प्रशंसा केली.

या सर्वांच्या ऋणातच राहू इच्छितो.

गेल्या पस्तीस वर्षांपासून माझ्या कवितेचे मनमुक्त रसग्रहण करून दाद देणारे वरिष्ठ आयपीएस अधिकारी व पोलीस महासंचालक श्री. आशुतोष डुंबरे, सौ. रेणुकाताई डुंबरे, दुसरे मित्र श्री. सतीश व सौ. प्रतिभा वाबळे, नांदेडचे श्री. गजानन पिंपरखेडे, कित्येक वेळा माझ्या कवितांना कारणीभूत ठरणारी माझी सुविद्य पत्नी सौ. मुक्ता, माझे भाऊजी श्री. राजेंद्र पत्तीवार, जावई श्री. संतोष पत्ती व माझ्या दोन्ही बहिणी सौ. उमा आणि ज्योती, माझ्या मुली सौ. रसिका, युगंधरा, अस्मिता आणि गुरुपुत्र श्री अनंता महाराज तसेच माझ्या कवितांना वेळोवेळी प्रसिद्धी देणारी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध दैनिकं, साप्ताहिकं आणि दिवाळी अंक, माझ्या कवितांना दाद देणारे प्रशंसक, टीकाकार, ज्यांनी ज्यांनी या संग्रहासाठी मदत केली त्या ज्ञातअज्ञात सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

*माया ममता निकोप निर्मळ प्रेमपिसारा*
*गाभाऱ्याचा आई असतो सुगंध न्यारा ।*

*देवळातही तिची साधना झिरपत असते*
*आई म्हणजे कवच वेगळे उद अंगारा ।*

**बापू दासरी**
'उमाग्रज' नांदेड

# अनुक्रम


- आत्मिक आनंदाचा गाव १९
- प्रयाण-प्रहर २१
- कळवळ्याचं विद्यापीठ २२
- कवच एक परित्यागाचे २३
- अद्वितीय चेतना २४
- रिकामा खोपा २६
- प्रयाण पालखी २७
- आलेख वेदनेचा २८
- अंधारगर्भ २९
- संचित ३०
- विठूची पालखी ३२
- वात्सल्य ३३
- आतिथ्य ३४
- दिगंतायण ३५
- झाडांचे मौन ३६
- डोळ्यात उतरले कारुण्य ३७
- आत्म्याचे आलिंगन ३८
- प्रारब्धाचे झाड ३९

- सुरकुत्यांची शाल ४०
- वादळ तरंग ४१
- गुरुकृपेचे गोकुळ ४२
- निर्धार ४३
- कृतार्थ ठसे ४४
- मायेचा पदर ४५
- आई एक गोळाबेरीज ४६
- वनवास सुखाचा ४७
- स्पर्श संजीवन ४८
- कर्तृत्वाचे बेट ४९
- वादळवीणा ५०
- निर्मम साक्ष ५१
- उमाळे ५२
- प्रार्थना ५३
- मंतरलेले पाणी ५४
- लिपी अक्षरांची ५५
- सुरकुत्यांची शाळा ५६
- शुभं करोती ५७
- भासआभास ५९
- नवसंकीर्तन ६०
- अमृतयोग ६१

- चांदणभूल ६२
- मातृसूक्त ६३
- सुगंध कुपी ६४
- चंदनकाया ६५
- उपरती ६६
- कैवल्यकवच ६७
- कंदीलकाया ६८
- संकल्प सिद्धी ६९
- काजळकाठ ७०
- देह चंदनाचा ७१
- मातृपाठ ७२
- गंगाजल ७४
- हरिपाठ ७५
- काकस्पर्श ७६
- जपमाळ ७८
- उःशाप ८०
- कैवल्याचे झाड ८१
- गंध गाभारा ८२
- अंतस्मरण ८३

## कवच एक परित्यागाचे

तुझा मायाळू हात
पाठीवरून फिरत असताना
मायेची ऊब आणि एक
कवच बहाल करीत असे

स्पर्शातून दरवळणारा गंध
माझ्या सगळ्या अलाबला
टाळून सुरक्षित ठेवीत असे
अस्तित्व,

परित्यागाच्या वृत्तीच्या
जोपासनेचा संदेश
प्रसारित करत,
जगण्याचा धूप
मानव्याची दीपज्योत
तेवत असताना
अचानक
मालवणं तुझं...

# निर्धार

रे मना तू जीवनाचा, मज पुन्हा अनुप्रास दे
उदास भरल्या सांजवेळी, कोवळा तू श्वास दे

उंच घेऊ दे भरारी, लाभता अंबर खुले
आसवाच्या अत्तराला, संयमी आरास दे

काळजाची बाग माझी, गंधभरली कर जरा
जास्त नाही एक साधक, केवडा हमखास दे

श्वास संपेतो सदोदित, ताठ राहू दे कणा
नेहमी श्रावण नको पण, एकदा मधुमास दे

वेदनेला अंत नाही, सोबतीला काळजी
रंगला हा डाव आहे, फक्त तू विश्वास दे

# उमाळे

हरेक दिवस आईचा एक दिवस नसतो कधी
उभ्या हयातीत तिच्या ओटीत मी नसतो कधी?

कल्पतरु आई असते समजेना कधी कुणा
तिला माहीत नेहमी अपुल्या सर्व जन्मखुणा

हृदयात डंख तिच्या सर्व असतात साठलेले
सहनशक्तीने आत अनेक उमाळे दाटलेले

कष्टावरती कोरत असते समाधानाची नक्षी
शहाळ्याचे प्रेम माया दाटलेली सदा वक्षी

पूजाअर्चा करताना जपप्रार्थना झुरत असते
लेकरांच्या यशाकरता आयुष्यभर पुरत असते

# भासआभास

मायेचे आकाश
मला लपेटून
दूर गेल्यावर
होत राहतात
नुसते भास
खुणेच्या ठिकाणी
सतत सवयीच्या
ऐकू येत राहतात
हाका...
आम्हाला जपण्याच्या
एकाच तणावात
झिजलेली हयात
लुकलुकत राहते
क्षणोक्षणी
सवयीच्या ममतेचे
पंख छाटले गेल्यावर
केवळ उरते
नुसती तडफड

## मातृसूक्त

उंदरांना तांदूळ
आणि मांजरीला
दूध देणे
परस्परविरोधी नाही काय?
असे आईला भाबडेपणे
विचारले तेव्हा
म्हणाली ज्याच्या
त्याच्या नशिबाने
ज्याला त्याला
मिळत जातो
प्रत्येकाचा वाटा
मुंग्यांना साखर पक्ष्यांना दाणे
झाडांना पाणी
अभ्यागतास चहापाणी
देत जावं सदा
आपण आपल्या
अहितचिंतकांनाही
देत जाव्यात शुभेच्छा
सदासर्वकाळ कधी द्यावा
अत्तराचा फायादेखील
सणावाराला
मग आपलं जीवन
कसं हळूहळू
सुखी होत जातं
ते आपणच बघावं परतून...
हेच आईचं
मातृसूक्त

## गंगाजल

एकाच थेंबाने
गंगाजल
पाजवून
अचेतन
देहांस
अग्नी
देतांना
आतून
पाणी
वरतून
तूप
परस्पर
विरोधी
सुख दुःखाचे
प्रतिक
भस्मांकित
होत
अस्थी
ज्वालात
सरतांना
डोळ्यांत
सर्वांच्या
तरळते
पाणी
क्षणभर